स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
मुख्य कार्यालय विरार
विरार (पु)
ता. वसई, जि. पालघर — ४०१३०५

दूरध्वनी : 0250-2525101/02/03/04/05/06
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. वविशम/आस्था/७०२/2022/23
दिनांक - २०/०९/2023

# जाहिर सूचना

वसई विरार शहर महानगरपालिका , मुख्यालय विरार येथे मालमत्ता व्यवस्थापन विभागासाठी सेवा निवृत्त तहसिलदार किंवा नायव तहसिलदार अथवा महानगरपालिकेच्या सेवेतुन निवृत्त झालेले सहाय्यक आयुक्त अथवा उप-आयुक्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पद्धतीने विवक्षित स्वरुपाचे कामकाज करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

**❖ विवक्षित सेवा / कामाचे स्वरुप :-**

१. तत्कालीन नगरपरिषद / पालिका यांचे नावे असलेल्या जमिनी म.न.पा.चे नावे हस्तांतरित /वर्ग करणेसाठी संबंधित तहसिलदार व प्रांत अधिकारी यांचे कार्यालयाशी पत्र व्यवहार करणे.
२. वसई विरार शहर महानगरपालिकेमध्ये समाविष्ट ग्रामपंचायत क्षेत्रामधील जे भूखंड / जमिनी तत्कालीन ग्रामपंचायतीचे नावे अधिकार अभिलेखात आहेत त्या भूखंडाचे / जमिनीचे अधिकार अभिलेखात (७/१२ proparty card ) मध्ये वसई विरार शहर महानगरपालिकेचे नाव भोगवटदार सदरी दाखल करणे.
३. महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेल्या जमिनीचे रजिस्ट्रेशन करणे.
४. महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केलेल्या सर्व मालमत्ता महानगरपालिकेच्या नांवे करणे तसे मनपाच्या मालमत्तेच्या ७/१२ वर नोंदी करणेची कार्यवाही करणे.
५. टी.आय.एल.आर. कडून जागा मोजुन घेणे.
६. जागेवर बोर्ड लावून घेणे व बांधकाम विभागामार्फत जागेला कुंपण घालून घेणे.
७. सदर मालमत्तांच्या नोंदी मालमत्ता रजिस्टरला घेऊन नोंद वहया अद्यावत ठेवणे.
८. मनपाच्या विविध मिळकती / गाळे /जागा इत्यादी नियमानुसार भाडे / लिजने वितरित करणे.
९. नगररचना विभागाकडुन भाडे / लिज दर प्राप्त करुन घेणे.
१०. लॅण्ड अॅण्ड इस्टेट मॅनेजमेट सॉफ्टवेअर विकसीत करुन घेणे.
११. भाडे करारनामा करणे व तसेच नुतनीकरण करणे.
१२. भाडे वसुली करणे.

**❖ पदसंख्या :-**

एकूण १ पद

(कृ.मा.प.)

❖ अटी व शर्ती :-

१. सदर नियुक्ती अकरा महिन्याचे कालावधीसाठी सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १७/१२/२०१६ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करण्यात येणार आहे. त्यानुसार मासिक परिश्रमिक अदा केले जाईल.

२. सेवानिवृत्त अधिकाऱ्यांचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

३. सेवानिवृत्त अधिकारी शारिरीक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

४. महानगरपालिकेतील सेवानिवृत्त उप-आयुक्त अथवा सहाय्यक आयुक्त यांना मालमत्ता व्यवस्थापन या विभागाचा कमीतकमी ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

५. नियुक्त सेवानिवृत्त अधिकाऱ्यांस वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात काम करावे लागेल.

६. कराराच्या कालावधीत सेवानिवृत्त अधिकारी आयुक्त तथा प्रशासक, आयुक्त, अतिरिक्त आयुक्त व उप-आयुक्त यांच्या नियंत्रणाखाली काम करतील व त्यांना वेळोवळी कामकाजाचा अहवाल सादर करतील.

७. उमेदवाराने सदर पदाकरिता अर्ज सोबत जोडलेल्या नमुन्यात कोऱ्या कागदावर सुवाच्च अक्षरात लिहावा अथवा टंकलिखित करावा.

८. उमेदवाराने सदर पदाकरिता जाहिरातीच्या दिनांकापासुन आठ दिवसांच्या आत वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्य कार्यालय विरार, विरार(पुर्व), ता.वसई, जि.पालघर -४०१३०५ या पत्यावर पोहोचेल अशा रितीने पोस्टाने पाठवावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही. सदरची जाहिरात व अर्जाचा नमुना www.vvcmc.in या महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

(रमेश मनाळे)
अतिरिक्त आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

# अर्जाचा नमुना

वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्यालय विरार येथे मालमत्ता व्यवस्थापन विभागासाठी सेवा निवृत्त तहसिलदार किंवा नायब तहसिलदार अथवा महानगरपालिकेच्या सेवेतुन निवृत्त झालेले सहा. आयुक्त अथवा उप-आयुक्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पद्धतीने विवक्षित स्वरुपाचे कामकाज करण्यासाठी नियुक्ती करणेबाबत.

| |
|---|
| उमेदवाराने अलिकडच्या काळातील स्वत:चे छायाचित्र येथे लावावे. |

१. अर्जदाराचे संपुर्ण नाव :-

२. अर्जदाराचा पत्ता :-

३. सेवानिवृत्तीच्या वेळेचे पदनाम :-

४. भ्रमणध्वनी क्रमांक :-

५. जन्म दिनांक व वय :-

६. शैक्षणिक अर्हता :-

७. अनुभव :-

उपरोक्त पदावर करार पद्धतीने नियुक्तीबाबत जाहिरात / सुचना मी काळजीपुर्वक वाचली असुन, सदर सुचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :-
दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी